शुक्रवार दि. १२ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनेश्वहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## तपपूर्तीच्या प्रचाराला विलंबाचे ग्रहण; पत्रकारांनी दाखवला स्वाभिमान

### जालन्यात भाजप आमदारांच्या पत्रकार परिषदेला पत्रकारांचा बहिष्कार

**जालन - प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या आणि कामगिरीच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेला भाजपच्या वरिष्ठ लोकप्रतिनिधींच्या विलंबामुळे जालन्यात बुधवारी मोठा वाद निर्माण झाला. सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेसाठी पत्रकार वेळेवर उपस्थित राहिले होते. मात्र नियोजित वेळ उलटून तब्बल पाऊण तासाहून अधिक कालावधी लोटल्यानंतरही प्रमुख पाहुणे असलेले आमदार बबनराव लोणीकर आणि भाजप जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे कार्यक्रमस्थळी पोहोचले नसल्याने पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी पसरली.

जालन्यातील सॅफरॉन हॉटेल येथे आयोजित पत्रकार परिषदेत केंद्र सरकारच्या कार्याचा आढावा आणि विविध योजनांची माहिती देण्याचा उद्देश होता. पत्रकार परिषदेसाठी शहरातील अनेक वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या आणि डिजिटल माध्यमांचे प्रतिनिधी वेळेवर उपस्थित झाले होते. मात्र नियोजित वेळेपासून जवळपास ५० मिनिटांहून



अधिक विलंब झाल्यानंतरही प्रमुख नेते न आल्याने उपस्थित पत्रकारांनी नाराजी व्यक्त करण्यास सुरुवात केली.

**''वेळ पत्रकारांचाही मौल्यवान''**

सकाळी ११.३० वाजताची वेळ देण्यात आली असताना दुपारी १२.२० वाजेपर्यंत संबंधित आमदार आणि पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित न झाल्याने पत्रकारांचा संयम संपला. ''पत्रकारांचाही वेळ महत्त्वाचा आहे. लोकप्रतिनिधींनी पत्रकारांना गृहीत धरू नये,'' अशी भूमिका घेत उपस्थित पत्रकारांनी एकमताने पत्रकार परिषदेला बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला.

यावेळी उपस्थित असलेल्या स्थानिक लोकप्रतिनिधी वंदना मगरे आणि राजेश राऊत यांनी पत्रकारांना थांबवण्याचा प्रयत्न केला. काही वेळ आणखी प्रतीक्षा करण्याची विनंतीही करण्यात आली. मात्र पत्रकारांनी आपला निर्णय कायम ठेवत परिषदस्थळ सोडले.

**लोणीकरांनी मागितली माफी; तरीही पत्रकारांचा निर्णय कायम**

पत्रकार निघून जाण्याच्या दरम्यान आमदार बबनराव लोणीकर कार्यक्रमस्थळी पोहोचले. उशीर झाल्याबद्दल त्यांनी पत्रकारांची माफी मागत पुन्हा परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन केले. मात्र त्यावेळी बहुतेक पत्रकारांनी कार्यक्रमस्थळ सोडले होते. *(पान. २ वर)*

## धारदार खंजीरसह युवक जेरबंद ; नूतन वसाहत उड्डाणपुलाखाली संशयास्पद हालचाली

### शिताफीने पाठलाग करून आरोपीला पकडले, भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कदीम जालना पोलिसांनी गुरुवारी दुपारी केलेल्या धडक कारवाईत धारदार खंजीर बाळगून फिरणाऱ्या एका युवकाला जेरबंद केले. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचत आरोपीचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. आरोपीकडून सुमारे १,२०० रुपये किमतीचा धारदार खंजीर जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल



करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ११ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.२० वाजता कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोहेकॉ सदाशिव विनायक राठोड, पोलीस कॉन्स्टेबल दिलीप गायकवाड आणि मुकेश पढे हे पोलीस ठाण्याच्या हद्दीत नियमित गस्त घालत होते. त्यावेळी गुप्त बातमीदारामार्फत नूतन वसाहत उड्डाणपुलाखाली, जुना जालना परिसरात एक युवक हातात धारदार शस्त्र घेऊन संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाली.

**गुप्त माहितीवरून तात्काळ सापळा**

सदर माहिती मिळताच पोलिसांनी ही बाब कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या निदर्शनास आणून *(पान. २ वर)*

**जालना विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचा भव्य संवाद मेळावा उत्साहात संपन्न**

## राज्यमंत्री आशीष जयस्वाल व आमदार अर्जुन खोतकर यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

**जालना । प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघातील शिवसेना संघटना अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला बूथप्रमुख, गटप्रमुख, बी.एल.ए., पदाधिकारी व शिवसैनिकांचा भव्य संवाद मेळावा गुरुवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या मेळाव्याला शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने




उपस्थिती लावत पक्ष संघटनेप्रती आपली बांधिलकी दर्शविली.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री आशीष जयस्वाल होते, तर शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत संपूर्ण सभागृह शिवसेनामय करून टाकले.

**मतदार यादी पुनर्विलोकन मोहिमेला गती देण्याचे आवाहन**

राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात आगामी निवडणुकांसाठी मतदार यादी अचूक आणि अद्ययावत असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. मतदार यादी पुनर्विलोकन () मोहिमेत प्रत्येक *(पान. २ वर)*

## तुकाराम मुंढे यांची किमान तीन वर्षे बदली करू नये; धमक्यांच्या पार्श्वभूमीवर कुटुंबाला सुरक्षा द्या- तय्यब देशमुख यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची किमान तीन वर्षे बदली करू नये तसेच त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला आवश्यक सुरक्षा पुरवावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेल्या या निवेदनात देशमुख यांनी तुकाराम मुंढे यांची प्रतिमा ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून देशातील प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकारी म्हणून असल्याचे



म्हटले आहे. राज्यातील वाढत्या भेसळीच्या प्रकारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागात त्यांनी सुरू केलेल्या कारवायांचे कौतुक करत त्यांच्या कार्यकाळाला स्थैर्य देण्याची गरज व्यक्त केली आहे.

देशमुख यांनी निवेदनात नमूद केले आहे की, तुकाराम मुंढे यांची प्रशासकीय सेवेत गेल्या २१ वर्षांत तब्बल २५ वेळा बदली झाली आहे. इतक्या वारंवार बदल्यांमुळे प्रामाणिक अधिकाऱ्यांना प्रभावीपणे काम करण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी मिळत नसल्याची भावना जनतेत निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्य सरकारने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन त्यांना किमान तीन वर्षांचा पूर्ण कार्यकाळ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

भेसळमुक्त महाराष्ट्रासाठी मुंढे यांचे काम महत्त्वाचे

निवेदनात राज्यातील अन्न व औषधांच्या भेसळीचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि औषधांमुळे नागरिकांच्या *(पान. २ वर)*

**जालन्यात मनपाची मोठी धडक कारवाई**

## ४ ते ५ क्विंटल प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग जप्त

**दोन मालकांना १० हजारांचा दंड; प्लास्टिक उत्पादक व साठेबाजांमध्ये खळबळ, नियमभंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा**

**जालना । प्रतिनिधी**

पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात जालना महानगरपालिकेने मोठी मोहीम हाती घेत धडक कारवाई केली आहे. शहरात बेकायदेशीरपणे प्लास्टिक कॅरीबॅगचे उत्पादन व साठवणूक सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर महानगरपालिका प्रशासनाने विशेष संयुक्त भरारी पथकाच्या माध्यमातून छापा टाकत तब्बल ४ ते ५ क्विंटल (सुमारे ४०० ते ५०० किलो) प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅगचा साठा जप्त केला. या प्रकरणात दोन



वेगवेगळ्या मालकांवर कारवाई करून प्रत्येकी ५ हजार रुपये, असा एकूण १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

या कारवाईमुळे शहरातील प्लास्टिक उत्पादक, साठेबाज आणि विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून मनपा प्रशासनाने यापुढेही अशाच प्रकारच्या धडक कारवाया सुरू ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

**गुप्त माहितीच्या आधारे आखली मोहीम**

जालना शहरात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आणि साठा अद्यापही मोठ्या प्रमाणात होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे सातत्याने येत होत्या. काही ठिकाणी छुप्या पद्धतीने प्लास्टिक कॅरीबॅगची निर्मिती करून त्याचा पुरवठा बाजारात केला जात असल्याची माहितीही महानगरपालिकेला प्राप्त झाली होती.

या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्तांनी तातडीने दखल घेत संबंधित विभागांना संयुक्त कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार विशेष भरारी पथकाची स्थापना करण्यात आली. पथकाने कोणतीही पूर्वसूचना न देता संशयित ठिकाणांवर अचानक धाड टाकली. या अचानक झालेल्या कारवाईमुळे संबंधित व्यावसायिकांची मोठी धावपळ उडाल्याचे सांगण्यात येते.

**गोदामांची झडती; मोठ्या प्रमाणावर माल जप्त**

कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी संबंधित गोदामे आणि साठवणूक केंद्रांची कसून तपासणी केली. झडतीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅगचा साठा आढळून आला. पंचांसमक्ष संपूर्ण प्रक्रिया पार पाडत अधिकाऱ्यांनी जप्ती पंचनामा केला.

जप्त करण्यात आलेल्या प्लास्टिकचा एकूण साठा अंदाजे *(पान. २ वर)*

## श्रीक्षेत्र पुष्कराणी परिसरात बोट दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क

### सुरक्षा उपाययोजना करण्याचे जिल्हा प्रशासनाचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र पुष्कराणी, ता. माजलगाव, जि. बीड येथे काल (दि.१०) घडलेल्या बोट दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत तसेच नागरिकांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सर्व संबंधित विभागांना तातडीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांनी जारी केलेल्या आदेशानुसार महसूल, पोलीस, नगर परिषद आणि इतर संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून नदी, तलाव, घाट परिसर आणि जलवाहतुकीच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यास सांगितले आहे.

प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार उपविभागीय अधिकारी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन गोळेगाव, सावंगी गंगाकिनारा आणि पुष्कराणी परिसरातील नौकाविहार, घाट परिसर, बोट वाहतूक व भाविकांच्या हालचालींसाठी स्वतंत्र मानक कार्यपद्धती () तयार करून तिची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच तहसीलदारांनी संबंधित परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करावे व तयार करण्यात आलेल्या एसओपीचे पालन होत असल्याची खात्री करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने विशेषतः नदीपात्रातील जलवाहतुकीवर लक्ष केंद्रित केले असून गोळेगाव, सावंगी गंगाकिनारा आदी ठिकाणी भाविकांची वाहतूक शक्यतो रस्तेमार्गाने (बाय रोड) वळविण्याच्या सूचना देण्यात याव्यात, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

भाविक अथवा नागरिकांनी नदीपात्रातून किंवा बोटीच्या माध्यमातून प्रवास करू नये यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय नदीपात्रातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या विनापरवाना, अवैध अथवा असुरक्षित बोटींचे संचालन पूर्णतः बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अशा बोटी आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. घाट परिसरात गर्दी नियंत्रण, प्रवेश व्यवस्थापन आणि सुरक्षा नियमांचे पालन यासाठी आवश्यक तेथे पोलीस बंदोबस्त वाढविण्यात येणार आहे.

मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी गोळेगाव व सावंगी गंगाकिनारा परिसरात आवश्यकतेनुसार स्वयंसेवकांची नियुक्ती करून नागरिकांना मार्गदर्शन, गर्दी व्यवस्थापन, सूचना प्रसारित करणे आणि सुरक्षा उपाययोजनांच्या अंमलबजावणीस मदत करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच नदीपात्राकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर, घाट परिसरात आणि सार्वजनिक ठिकाणी धोक्याबाबतचे सूचना फलक, दिशादर्शक फलक व प्रतिबंधात्मक सूचना लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महसूल, पोलीस, नगर परिषद आणि इतर विभागांनी संयुक्त गस्त घालून नियमित पाहणी करण्यासही सांगितले आहे. कोणत्याही प्रकारची दुर्घटना, आपत्कालीन परिस्थिती किंवा नियमभंगाची घटना निदर्शनास आल्यास संबंधित यंत्रणांनी तात्काळ प्रतिसाद देऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## मोदी सरकारची १२ वर्षे : सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाचा सुवर्णकाल विकसित भारताच्या दिशेने देशाची वेगवान वाटचाल - आ. लोणीकर

### मोजक्याच पत्रकारांच्या उपस्थितीत दिली माहिती

**जालना । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची गेली बारा वर्षे ही देशाच्या इतिहासातील सेवा, सुशासन, गरीब कल्याण आणि विकासाचा सुवर्णकाल ठरला असून ''सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास'' या मंत्राच्या बळावर भारत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

केंद्रातील मोदी सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित मोजक्याच पत्रकारांच्या उपस्थितीतील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार नारायण कुचे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, अशोक पांगारकर, अक्षय गोरंट्याल, जिल्हा सरचिटणीस अनिल कोलते, महेश निकम, शशिकांत घुगे, जीवन सले, सुजित जोगस, शिवराज नारियलवाले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

**भारताचा जागतिक स्तरावर वाढता दबदबा**

आमदार लोणीकर म्हणाले की, २०१४ नंतर देशाने आर्थिक, सामाजिक, तांत्रिक आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात ऐतिहासिक प्रगती केली आहे. जी-२० परिषदेत भारताने यशस्वी नेतृत्व केले, चांद्रयान मोहिमेद्वारे अवकाश क्षेत्रात नवे विक्रम प्रस्थापित केले, संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू झाली आणि परकीय गुंतवणुकीत मोठी वाढ झाली. त्यामुळे भारत आज जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून ओळखला जात आहे.


गरीब कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य केंद्र सरकारने गरीब, महिला, युवक आणि शेतकरी यांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून विविध योजना राबवल्या. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत ८१ कोटी नागरिकांना मोफत धान्य देण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेतून ४ कोटींहून अधिक घरे बांधण्यात आली असून लाखो कुटुंबांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

# दादर ते दादर : पुस्तक परिचय
# समाजसेवक दलितमित्र राजा जाधव यांचा जीवनप्रवास

दादर ते दादर हे पुस्तक आहे एका सच्च्या समाजसेवकाची, निष्ठावंत संघटना कार्यकर्त्याची, सामाजिक निकषांप्रमाणे अत्यंत कमी शिक्षण झाले असूनही ठाणे- मुंबईतील एक प्रतिथयश बांधकाम व्यावसायिक तसेच विकासकाची प्रेरक गाथा...ग्रंथाली प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे चरित्र नायकाचा करारी चेहरा असलेले मुखपृष्ठ आपल्याला खिळवून ठेवते.

बिल्डर म्हटले की आपल्या डोळ्यासमोर सर्वसाधारणपणे असलेल्या प्रतिमेला छेद देणाऱ्या, गोरगरीब, अपघातग्रस्त, आदिवासी विद्यार्थी यांना आपला व्यवसाय बाजूला ठेवून मदत (बहुतेक वेळा आर्थिक मदत) करणाऱ्या, आणि हे सर्व करीत असताना आपले विविध छंद जोपासणाऱ्या राजा जाधव नामक अफाट व्यक्तिमत्वाचे शब्दरूप लेखक दादासाहेब दापोलीकर या नावाने लेखन करणारे श्री. सुमंत जुवेकर यांनी हे चरित्र लिहिले आहे. दादर ते दादर या पुस्तकाच्या नावात दोनदा तोच शब्द कसा काय ? हा प्रश्न वाचकाच्या मनात येतोच येतो. अपरांत प्रदेशाची प्राचीन राजधानी शूर्पारक म्हणजेच आताचे नालासोपारा येथील दादर (म्हणजे प्राचीन काळी नौका थांबण्याचे स्थान) ते राजाभाऊंचे सध्याचे निवासस्थान असलेले मुंबईतील दादर उपनगर इथपर्यंतचा चरित्रनायकाचा जीवनप्रवास उलगडून दाखवणारे हे पुस्तक- म्हणजे दादर ते दादर ! दहावी नापास मुलगा ते यशस्वी बिल्डर हा धाडसी प्रवास या पुस्तकात एकूण तेरा प्रकरणांमध्ये लेखकांने प्रवाही पद्धतीने लिहिला आहे.

साष्टी ते सुरत आणि सुरत ते नालासोपारा, बालपण या पहिल्या प्रकरणात राजाभाऊंच्या पूर्वजांचा संबंध प्रत्यक्ष शिवाजी महाराजांशी कसा आला होता, याची सुरस कहाणी वाचून आपण थक्क होतो. राजा यांचे भावंडांच्या सहवासातील, एकत्र कुटुंबातील ते दिवस म्हणजे भावुकतेने भरलेल्या रम्य आठवणी आहेत. खोडकरपणा, घरी आणि शाळेत करीत असलेले नसते उपद्याप यासाठी संपूर्ण गावामध्ये प्रसिद्ध असलेल्या राजाने आईच्या, मोठ्या बहिणीच्या हातचा कैकदा मार खाल्ला. पण त्यांच्यातील प्रेम कधी कमी झाले नाही. कठीण परिस्थिती असली, तरीही घरातील मोठ्या माणसांनी सर्व मुलांवर शिक्षणाचा संस्कार आवर्जून केला होता. वारंवार प्रयत्न करूनही शाळा आणि अभ्यासाचे गणित न साधलेल्या राजाने नोकरीसाठी प्रयत्न करण्याचे ठरवले. सुरुवातीलाच हातमागावर काम करण्याची नोकरी मिळवली. नंतर काही वर्षे रिक्षा चालवली, कापड विकले, टोप्या विकल्या, दुकानही चालवले.चांगल्या मार्गांचा अवलंब करून पैसे कमवण्यासाठी राजाने कुठलीही लाज बाळगली नाही. या उद्योगीपणामध्येच पुढील आयुष्यात मिळणाऱ्या देदीप्यमान यशाची बीजे रोवली गेली होती.



त्यानंतर वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये नोकरी करण्याचा अनुभव घेणाऱ्या राजाने प्रेमाचे गणितदेखील सोडवले. सुरेखा नावाची एक गोड मुलगी राजाच्या आयुष्यात नकळत आली. सुरेखालाही रुबाबदार, तिला धाडसी राजा पसंत होता. त्या दोघांनी एकमेकांना जीवनभर साथ देण्याचा निर्णय घेतला. जातीपातीच्या संकल्पनांमुळे या आंतरजातीय विवाहाला सुरुवातीला सुरेखाच्या घरच्यांचा विरोध होता. तरीही सुरेखाने राजाला खंबीरपणे साथ दिली. सहजीवनाचे मधुर क्षण अनुभवताना त्या दोघांनाही कधी कधी कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागत होते. संसाराची, कुटुंबाची जबाबदारी पेलण्यास समर्थ असलेला राजा मोठ्या खटपटी करत होता. कुणाचे उपकार घेणे त्याला ठाऊक नव्हते. आईवडील, भावंडे या साऱ्यांच्या पाठिंब्याने राजा - सुरेखाचे जीवन गोड वळण घेत होते. संसारवेलीवर फुले उमलली होती. घराला गोकुळाचे स्वरूप आले होते. कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या राजा कागदी पिशव्या बनविणे आणि असे छोटे छोटे व्यवसाय करत होताच. याच काळामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत आणि मऱ्हाटमोळ्या नेतृत्वाचा उदय होत होता. त्यावेळच्या अनेक मराठी तरुणांप्रमाणे राजासुद्धा बाळासाहेबांकडे आणि पर्यायाने शिवसेनेकडे आकृष्ट झाला. मराठी माणसाच्या न्यायहक्कांसाठी शिवसेनेच्या आंदोलनांमध्ये राजा सहभागी होऊ लागला. आता राजा ची ओळख राजाभाऊ म्हणून होण्यास सुरुवात झाली होती. राजाभाऊंनी बंधू रमण, विजय, शरद यांच्यासहित बांधकाम व्यवसायात प्रवेश केला होता. रिक्षा, दुकानदारी ते थेट बिल्डर्स अँड डेव्हलपर्स या प्रकरणात लेखकांनी बिल्डर व्यवसायातील बारकावे, खास तेथे वापरल्या जाणाऱ्या परिभाषा, त्यातील येणाऱ्या अडचणी, त्या अडचणींवर केलेली मात असा सर्व प्रवास अचूकतेने आणि प्रभावीपणे आणि महत्त्वाचे म्हणजे या क्षेत्राशी संबंधित नसलेल्या वाचकालाही समजेल अशा साध्या, सोप्या भाषेमध्ये मांडला आहे. बांधकाम व्यावसायिकांचे यश आणि पैसा सर्वांना दिसतो. परंतु त्यासाठी ते घेत असलेले कष्ट आणि धोके लोकांना माहीत नसतात. बांधकाम व्यवसायातील अनेक खाचाखोचा, संभाव्य धोके, जबाबदाऱ्या यांचे रंजक परंतु वास्तववादी वर्णन वाचायला मिळते. समाजसेवा या प्रकरणात राजाभाऊंच्या आयुष्यात आलेल्या हृदयद्रावक, कठीण प्रसंगांचे वर्णन वाचताना आपणही हळवे होतो. कोणावर कशी वेळ येईल सांगता येत नाही. मात्र राजाभाऊंसारखा देवदूत पीडितांच्या पाठीशी उभा असतो. कधी रेल्वे अपघात झाला, तेव्हा बेधडकपणे जखमी रुग्णांना रुग्णालयात पोहोचवणे, रुग्णवाहिकेची व्यवस्था करणे, गरीब, दलित, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप करणे, त्यांना आर्थिक साहाय्य करणे, पालघर, जव्हार, मोखाडा, खोडाळा वगैरे शाळांना दिवाळीचा फराळ, औषधे, शिष्यवृत्ती वाटणे, तसेच रक्तदान शिबीरे उभारणे, समाजात घडणाऱ्या महत्वाच्या घटनांची दखल घेऊन त्याच्या चित्रफितींचे प्रदर्शन भरवणे, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगवान गौतम बुद्ध अशा महापुरुषांच्या पुतळ्यांची उभारणी करणे, विविध आंदोलने, मोर्चे यांचे नेतृत्व करणे, मोठमोठ्या सभा आपल्या खणखणीत, बेधडक भाषणांनी गाजवणे अशी अनेक सामाजिक व्रते अंगिकारलेला हा बाळासाहेबांचा लाडका शिवसैनिक म्हणजे राजाभाऊ. निरलसपणे सेवा करण्याचे व्रत अंगीकरलेल्या राजाभाऊंना त्यांच्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून १९९७ साली दलितमित्र पुरस्कार देण्यात आला.

आयुष्य हे सरळमार्गी कधीच नसते. कधी सुखाचे हिंदोळे तर कधी दुःखाचे डोह अनुभवास येतात. पण म्हणून आयुष्य थांबत नाही. ते पुढे जातच असते. राजाभाऊंच्या आयुष्यात सुख ओसंडून वाहत असताना एक दिवस अचानक मोठे वादळ आले. त्यांच्या पत्नीचे सौ. सुरेखाताईंचे अकस्मात निधन झाले. या प्रसंगाचे आलेले वर्णन 'भूकंप ! सुरेखाताईंचे निधन' या प्रकरणात वाचताना आपण सारेच त्या दुःखाशी समरस होतो. राजाभाऊंच्या आयुष्यात आलेले हे कठीण वळण ! राजाभाऊ एकटे पडले होते. पण आपल्या भावना एका जागी आणि संसाराचे व्यवहार दुसऱ्या जागी. मुलांचे संगोपन, घरी येणाऱ्या - जाणाऱ्यांचे आदरातिथ्य, समाजसेवा, व्यवसाय या सगळ्या गोष्टी एकट्याने निभावणे शक्य नव्हते. यासाठी जीवनसाथीची अत्यंत आवश्यकता होती. राजाभाऊंनी दुसरा विवाह केला. या विवाहाची कथाही एखाद्या बॉलीवूड चित्रपटासारखी मनोरंजक आणि एखाद्या रोलर कोस्टर राईड प्रमाणे आहे. सायन रुग्णालयातील प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ.अलकाताई या त्यांच्या द्वितीय पत्नी. अलकाताईंनी राजाभाऊंच्या संसाराला योग्य दिशा दिली. अलकाताई आणि राजाभाऊंना पुत्ररत्नही प्राप्त झाले. अलकाताईंनी कधीही सख्खं अपत्य, सावत्र अपत्य असा भेदभाव केला नाही. आधीच्या लहानग्या जीवांना मायेची पाखर मिळाली, दुःखी जीवाला आधार लाभला, जीवन पुन्हा एकदा हास्य पांघरून पुढे जाऊ लागले. थोरामोठ्यांचा सहवास या प्रकरणात राजाभाऊंच्या जीवनात आलेल्या महान व्यक्तींचा लेखकांनी परिचय करून दिला आहे. बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, आनंद दिघे, मनोहर जोशी, अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, बाबासाहेब पुरंदरे, प्रमोद महाजन, बाळाराव सावरकर, आदि महान प्रभृतींशी त्याचे स्नेहबंध कसे विकसित होत गेले याचा आढावा घेतलेला आहे.

समाजसेवा, व्यवसाय आणि संसार या तीन आघाड्यांवर काम करीत असताना राजाभाऊंनी एक चौथी आघाडी उघडली होती ती म्हणते छंद जोपासण्याची ! आपले शिक्षण कमी झाले ही खंत राजाभाऊंच्या मनात होती. परंतु त्यामुळे रडत न बसता किंवा त्याचा बाऊ न करता त्यांनी ती कसर आपल्या वाचन छंदाने भरून काढली. त्याचबरोबर राजाभाऊंनी आणखीही काही चांगले छंद जोपासले होते. अनोख्या छंदाची कहाणी या प्रकरणात शिवकालीन नाणी, समया, शंख, शिवचरित्राची पुस्तके इत्यादी अनेक वस्तूंचा संग्रह कसा केला, त्यांनी वस्तुसंग्रहालय कसे निर्माण केले, याचे वर्णन आले आहे. राजाभाऊंचे अक्षर हा एक वेगळा कौतुकाचा विषय. कुठलेही सुलेखनाचे शिक्षण घेतलेले नसताना राजाभाऊंनी बालपणातच मराठी सुलेखन कौशल्य () आत्मसात केली आहे. त्याचाही पुढे त्यांना व्यवसाय आणि संघटना यामध्ये अत्यंत उपयोग झाला. राजाभाऊंचे हस्ताक्षर या पुस्तकामध्ये एका पानावर छापलेले आहे. राजाभाऊंनी स्वतःच्या सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले उतारे, अनेक सुविचार, सुभाषिते, परिच्छेद स्वतःकडे यांचे संकलन केले होते. त्यातूनच सहज सुचलं म्हणून.... ही तीन पुस्तकांची एक मालिका त्यांनी प्रकाशित केली आहे. राजाभाऊंच्या नालासोपारा येथील निवासस्थानी त्यांचे स्वतःचे सुसज्ज वाचनालय आणि त्याचबरोबर एक संदर्भ ग्रंथालयही आहे. येथे पाच हजारपेक्षा अधिक पुस्तके आहेत. राजाभाऊंचे हे वाचनालय, वस्तुसंग्रहालय तसेच त्यांचे संदर्भ ग्रंथालय पूर्वसूचनेने कुणालाही पाहण्यासाठी आणि उपयोगासाठी उपलब्ध आहे. अशा विविध प्रकरणांतून राजाभाऊंची ही जीवनयात्रा येऊन ठेपते 'राजा माणूस' ह्या प्रकरणाशी.. कधी उद्योगी तर कधी कुटुंबवत्सल, कधी सच्चा समाजसेवक तर कधी बांधकामाच्या साईटवर कामगारांचे प्रश्न सोडवताना आढळणारा बांधकाम व्यावसायिक अशी विविधांगी रूपे ते साकारताना राजाभाऊंच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आपल्यासमोर येत जातात. लहानपणापासूनच अर्थार्जनासाठी नाना उद्योग करणारे हे प्रेरक व्यक्तिमत्व तरुणांसाठी मोठे प्रेरणास्थान आहे. कष्टाविण फळ ना मिळते ह्या उक्तीची यथार्थता हे पुस्तक वाचत असताना आपल्याला ठाई ठाई जाणवत राहते.

आजही दादरच्या रहदारीच्या विभागात असलेल्या जाधवबंधूनी बांधलेल्या गार्डन कोर्ट या उत्तुंग इमारतीच्या तिसाव्या मजल्यावर राजाभाऊंची स्वारी कधी पुस्तक वाचनात मग्न तर कधी हस्ताक्षराचे अप्रतिम नमुने साकारण्यात व्यग्र असलेली पाहायला मिळते. तुम्ही कधीही तेथे जा. तुमचे स्वागत होतेच. आपण रंगून जातो तो पुस्तकांचा प्रचंड संग्रह पाहून, हरवून जातो तो शिवकालीन नाण्यांचा संग्रह बघून, अशा ह्या चरित्रप्रवासाचे आपणही वाचन साक्षीदार व्हायलाच हवे. एकूणच हे पुस्तक ओघवती भाषा, आकर्षक रंगसंगती, अक्षराचा पोत, बांधणी, सामाजिक मूल्य अशा अनेक निकषांवर पूर्णपणे उतरते. लेखक दादासाहेब दापोलीकर यांनी सहजसोप्या, प्रवाही, प्रभावी शैलीत लिहिलेल्या एका समाजसेवकाच्या, एका सच्छील, उद्यमशील माणसाच्या कार्यकर्तृत्वाचा चढता आलेख प्रत्येकाने वाचायलाच हवा.

**- रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**

---

# पान १वरुन....

## तपपूर्तीच्या प्रचाराला...

दरम्यान, भाजप जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे हे आणखी उशिराने कार्यक्रमस्थळी दाखल झाले. तोपर्यंत पत्रकार परिषद जवळपास निष्प्रभ ठरली होती. त्यामुळे पक्षाच्या नियोजनाबाबत आणि वेळेच्या व्यवस्थापनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

**राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण**

या घटनेनंतर जालन्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. पत्रकार परिषद ही माध्यमांमार्फत शासनाच्या योजना आणि धोरणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम मानली जाते. मात्र अशा कार्यक्रमांमध्ये वेळेचे पालन न झाल्यास त्याचा परिणाम पक्षाच्या प्रतिमेवर आणि जनसंपर्कावर होऊ शकतो, अशी प्रतिक्रिया अनेकांकडून व्यक्त होत आहे.

**पत्रकारांचा संदेश स्पष्ट**

या बहिष्कारातून जालन्यातील पत्रकारांनी लोकप्रतिनिधींना स्पष्ट संदेश दिल्याची चर्चा आहे. लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची भूमिका महत्त्वाची असून त्यांच्याशी संवाद साधताना वेळेचे आणि शिष्टाचारांचे पालन होणे अपेक्षित आहे. कोणत्याही पदावरील व्यक्तीने पत्रकारांना तासन्तास प्रतीक्षा करायला लावणे योग्य नसल्याची भावना या घटनेतून समोर आली.

या घटनेनंतर सर्वसामान्य नागरिकांमधूनही प्रश्न उपस्थित होत आहेत. स्वतःच्या सरकारच्या कामाची माहिती देण्यासाठी आयोजित कार्यक्रमालाच वेळेवर उपस्थित राहता येत नसेल, तर जनतेच्या तातडीच्या प्रश्नांकडे कितपत गांभीर्याने पाहिले जात असेल, असा सवाल काही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

जालन्यातील पत्रकारांनी केलेला हा बहिष्कार केवळ एका पत्रकार परिषदेपुरता मर्यादित नसून लोकप्रतिनिधींनी माध्यमांचा आणि वेळेचा आदर राखावा, या व्यापक संदेशाचे प्रतीक मानला जात आहे.

## धारदार खंजीरसह...

दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पंचांना सोबत घेऊन पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी रवाना झाले.

दुपारी सुमारे ४.३० वाजता पथकाने नूतन वसाहत उड्डाणपुलाखाली पाहणी केली असता एक युवक हातात धारदार शस्त्र घेऊन फिरताना आढळला. पोलिसांची चाहूल लागताच संबंधित युवकाने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्याचा पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेतले.

**आरोपीकडून धारदार खंजीर जप्त**

झडतीदरम्यान आरोपीच्या ताब्यातून एक लोखंडी स्टीलचा, चमकदार पात्याचा, एका बाजूने धारदार व पुढील बाजूस टोकदार असलेला खंजीर जप्त करण्यात आला. या खंजीराला काळ्या रंगाची प्लास्टिकची मूठ असून त्याची एकूण लांबी सुमारे ३१ सेंटीमीटर असल्याचे पोलिसांनी सांगितले. जप्त करण्यात आलेल्या खंजीराची अंदाजे किंमत १,२०० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा**

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३११/२०२६ नोंद करण्यात आला असून आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४ आणि २५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अदिल कलीम शेख (वय २१ वर्षे, रा. हनुमान मंदिराजवळ, इंदिरानगर, जुना जालना) असे आहे. आरोपीकडे धारदार शस्त्र कशासाठी होते आणि तो कोणत्या उद्देशाने परिसरात फिरत होता, याचा तपास पोलीस करीत आहेत.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, पोहेकॉ सदाशिव राठोड, पोलीस कॉन्स्टेबल दिलीप गायकवाड आणि मुकेश पढे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या गुन्ह्याचा पुढील तपास महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल रेखा वाघमारे करीत आहेत.

**गुन्हेगारी प्रवृत्तींवर पोलिसांचा वचक**

शहरात वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कदीम जालना पोलीस सातत्याने गस्त, नाकाबंदी आणि विशेष मोहिमा राबवत आहेत. धारदार शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधातील ही कारवाई पोलिसांच्या सतर्कतेचे उदाहरण मानली जात असून, अशा प्रकारच्या कारवायांमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांचा वचक कायम राहणार असल्याचे बोलले जात आहे.

शहरातील शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधातील पोलिसांची मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत या कारवाईतून मिळत आहेत.

## राज्यमंत्री आशीष...

बूथप्रमुख, बी.एल.ए. आणि शिवसैनिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून एकही पात्र मतदार वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

''मतदार नोंदणी, नावांमध्ये दुरुस्ती, स्थलांतरित मतदारांची नोंद, दुबार व मयत मतदारांची नावे वगळणे या प्रक्रियांमध्ये कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. लोकशाही मजबूत करण्यासाठी अचूक मतदार यादी ही अत्यंत आवश्यक बाब आहे,'' असे जयस्वाल म्हणाले.

**अर्जुन खोतकर यांच्या नेतृत्वाचे कौतुक**

जालना जिल्ह्याला शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र विधानसभेतील सर्वात वरिष्ठ सदस्यांपैकी एक असलेल्या आमदार अर्जुन खोतकर यांचे नेतृत्व लाभले असल्याचे सांगताना जयस्वाल यांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले.

''अर्जुनराव खोतकर हे माझे मोठे बंधू आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्ह्यातील शिवसेना सातत्याने मजबूत होत आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ प्रत्येक शिवसैनिकाला होत आहे,'' असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासकामांचा प्रचार करण्याचे आवाहन

मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासाला नवी गती मिळाल्याचा दावा करत जयस्वाल यांनी सरकारच्या विविध योजनांची माहिती घराघरांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

''सामान्य नागरिकांच्या मनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. शासनाच्या लोककल्याणकारी योजना, विकासकामे आणि पक्षाची विचारधारा प्रत्येक गावात, प्रत्येक वाड्यात आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम केले पाहिजे,'' असे ते म्हणाले.

**बूथप्रमुख हा पक्ष संघटनेचा कणा : अर्जुन खोतकर**

यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांनी संघटनात्मक बांधणीमध्ये बूथप्रमुखांचे महत्त्व अधोरेखित केले. ''पक्ष संघटनेचा खरा कणा म्हणजे बूथप्रमुख. प्रत्येक बूथ मजबूत असेल तर निवडणुकीतील विजय निश्चित होतो. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत,'' असे त्यांनी सांगितले.

मतदार यादी अचूक करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय साधण्याचे निर्देशही त्यांनी कार्यकर्त्यांना दिले. बी.एल.ए. आणि बूथप्रमुखांनी आपल्या मतदान केंद्रातील प्रत्येक मतदाराची माहिती तपासून आवश्यक दुरुस्त्या वेळेत पूर्ण कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

**संघटन विस्तारावर भर**

मेळाव्यात नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे, युवावर्गाला पक्षाशी जोडणे, महिला सहभाग वाढविणे आणि बूथस्तरावरील संघटन अधिक सक्षम करणे यावर विशेष भर देण्यात आला. कार्यकर्त्यांच्या अपेक्षा, सूचना आणि अडचणी जाणून घेऊन पक्ष संघटना अधिक प्रभावी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही यावेळी नेत्यांनी दिली.

**कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

मेळाव्यादरम्यान शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत नेतृत्वाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना अधिक ताकदीने मैदानात उतरेल, असा विश्वास व्यक्त केला. या संवाद मेळाव्यामुळे जालना विधानसभा मतदारसंघातील संघटनात्मक कामाला नवी ऊर्जा मिळाल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, अनिरुद्ध खोतकर, ॲड. सुनील किनगावकर, फिरोजलाला, संतोषराव मोहिते, भुषण शर्मा, ॲड. भास्कर मगरे, रामेश्वर वाडेकर, विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, दिनकर घेवंदे, विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक अमोल ठाकूर, दिनेश भगत, योगेश भगत, दीपक राठोड, दुर्गेश काठोटीवाले, सगीर पहेलवान, अश्विन अंबेकर, किशोर पांगारकर, निखील पगारे, विजय जाधव, संजय डुकरे, युवासेना जिल्हाप्रमुख अजय कदम, गणेश मोहिते, पांडुरंग डोंगरे, सुधाकर वाडेकर, योगेश रत्नपारखे, राहुल गवारे, सविता केवंडे, कालिंदाताई ढगे, उज्वला फोपलिया, विजया चौधरी, गणेश सुपारकर, वसंतराजे जाधव यांच्यासह शिवसेनेचे विविध पदाधिकारी, नगरसेवक, सरपंच, पंचायत समिती सदस्य आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. मेळाव्याच्या समारोपावेळी आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेचा विजय निश्चित करण्यासाठी बूथस्तरापासून कामाला लागण्याचा निर्धार उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## ४ ते ५ क्विंटल...

४ ते ५ क्विंटल इतका असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. हा माल मनपा वाहनांच्या सहाय्याने महानगरपालिकेच्या गोदामात जमा करण्यात आला. कारवाईदरम्यान प्लास्टिक बंदी नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाल्याने संबंधित दोन मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. अधिकाऱ्यांच्या पथकाची समन्वयातून यशस्वी कारवाई

या विशेष मोहिमेत जालना महानगरपालिकेचे स्वच्छता विभाग प्रमुख सुधीर डहाळे, कार्यालय अधीक्षक आनंद अंभोरे, स्वच्छता निरीक्षक शुभम डहाळे, स्वच्छता निरीक्षक अजमत खान यांच्यासह मनपाचे कर्मचारी व सुरक्षा रक्षक सहभागी झाले होते.

पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने तपासणी करून संपूर्ण कारवाई पार पाडली. प्लास्टिकविरोधी मोहिमेत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी समन्वय साधल्यामुळे ही कारवाई प्रभावी ठरल्याची चर्चा मनपा वर्तुळात सुरू आहे.

प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी अधिक कठोर होणार

महाराष्ट्र शासनाने प्लास्टिक बंदीबाबत कठोर नियम लागू केले असतानाही अनेक ठिकाणी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर होत असल्याचे वारंवार समोर येत आहे. प्लास्टिकमुळे नाले तुंबणे, कचऱ्याचे प्रमाण वाढणे, जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होणे आणि पर्यावरणीय हानी होणे यासारख्या गंभीर समस्या निर्माण होत असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहरातील कोणत्याही भागात प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा, विक्री, वाहतूक किंवा उत्पादन होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर केवळ दंडात्मक कारवाईच नव्हे तर आवश्यकतेनुसार फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येतील. नागरिकांनाही सहकार्याचे आवाहन प्लास्टिकमुक्त आणि स्वच्छ शहर घडविण्यासाठी नागरिकांनी कापडी, कागदी किंवा पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करावा, तसेच प्रतिबंधित प्लास्टिकची विक्री किंवा उत्पादन होत असल्याची माहिती महानगरपालिकेला द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. मनपाच्या या कारवाईमुळे शहरातील प्लास्टिकविरोधी मोहिमेला नवे बळ मिळाले असून आगामी काळात अशाच प्रकारच्या कारवाया अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## तुकाराम मुंढे...

आरोग्याशी खेळ होत असून अशा परिस्थितीत कठोर आणि परिणामकारक कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अल्पावधीतच तुकाराम मुंढे यांनी मोठ्या प्रमाणावर धाडसत्र राबवून अनेक ठिकाणी छापे टाकले. या कारवायांमुळे भेसळखोर आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कारवायांना गती मिळाल्याचा दावा देखील निवेदनात करण्यात आला आहे.

''अशा अधिकाऱ्यांची राज्याला गरज''

देशमुख यांनी निवेदनात म्हटले आहे की, राज्यात तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिक प्रामाणिक आणि निडर अधिकारी निर्माण झाले तर भ्रष्टाचार आणि भेसळीच्या प्रकारांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल. प्रशासनातील पारदर्शकता वाढविण्यासाठी आणि जनतेचा विश्वास दृढ करण्यासाठी अशा अधिकाऱ्यांना पुरेसा कार्यकाळ देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

सुरक्षा देण्याचीही मागणी

अलीकडे तुकाराम मुंढे यांना कथित धमक्या मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षेचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. राज्य सरकारने याची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निवेदनाचा सकारात्मक विचार करून तुकाराम मुंढे यांना अन्न व औषध प्रशासन विभागात किमान तीन वर्षे कार्यरत ठेवावे आणि त्यांची अकाली बदली टाळावी, अशी अपेक्षा तय्यब बापू देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

# संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

## अशोक पत्की, आनंद भाटे, अरुण नलावडे यांच्यासह महाराष्ट्रातील दिग्गज व युवा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव

**नवी दिल्ली - वृत्तसेवा**

भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'संगीत नाटक अकादमी'च्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप', 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार'; तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज; तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर मानाचा सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील संगीत, नाट्य, नृत्य, लोककला आणि पारंपरिक कला क्षेत्रातील अनेक मान्यवर कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे. ज्येष्ठ कलावंतांसोबतच युवा कलाकारांनाही राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाल्याने महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळाली आहे.

**वर्ष २०२४ मधील महाराष्ट्राचे पुरस्कार मानकरी**

वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे. अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे; तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे.'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हिंदुस्तानी गायनासाठी कृष्ण बोंगाणे आणि अंकिता जोशी, भारूड या लोकसंगीत प्रकारासाठी भावार्थ रामचंद्र देखणे, बाहुलीनाट्य या दुर्मिळ लोककलेसाठी बाळकृष्ण गणपत मसगे आणि लोकनृत्य व लोकसंगीतासाठी चेतन वामन खेडेकर यांची निवड झाली आहे.

**वर्ष २०२५ मधील महाराष्ट्राचे पुरस्कार मानकरी**

वर्ष २०२५साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये शहनाई वादनासाठी शैलेश भागवत, दिग्दर्शन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की; तसेच कथक नृत्य क्षेत्रातील विशेष कार्यासाठी मनीषा साठे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे; तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हार्मोनियम वादनातील प्रभुत्वासाठी तन्मय देवचके आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जागर या लोकसंगीत प्रकारासाठी प्रवीण प्रताप जाधव यांची निवड करण्यात आली आहे.या पुरस्कारांचे स्वरूप अत्यंत प्रतिष्ठेचे असून, अकादमी पुरस्काराचे स्वरूप १,००,००० रुपये, ताम्रपट आणि शाल असे आहे, तर युवा कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारांतर्गत २५,००० रुपये, ताम्रपट आणि शाल देऊन सन्मानित केले जाते. हे पुरस्कार राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याचे अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

---

# राज्यातील सर्व आस्थापनांची पोश अधिनियमानुसार तपासणी

## करण्याचे महिला व बाल विकास आयुक्तांचे निर्देश

**मुंबई - प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी पोश कायद्यानुसार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. राज्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्यांबरोबरच जिल्हाधिकारी कार्यालयातील प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांचेसह १२ संवर्गातील ४००० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांनी राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये अधिनियमाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले आहेत. आयुक्त डॉ.जगदीश मिनीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली. बैठकीला राज्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, मुख्यसेविका यांचेसह सर्व १२ संवर्गातील अधिकारी उपस्थित होते. राज्यातील १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी-कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांच्या तपासणी बरोबरच १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त यांनी दिले. ज्या कार्यालये अथवा आस्थापनांमध्ये योग्य अंमलबजावणी होत नाही.

त्यांचेवर अधिनियमातील कलम २६ नुसार दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील सर्व विभागप्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये पॉश अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आवाहन केले आहे.

केंद्र शासनाच्या शी बॉक्स पोर्टल वरील नोंदींनुसार महाराष्ट्र देशातील इतर राज्ये व केंद्र शासित प्रदेश यांच्या तुलनेत अग्रेसर आहे. राज्यातील १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी-कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये पॉश अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

### नमो तेलबिया योजनेंतर्गत मोफत सोयाबीन बियाणे वाटपाचा शुभारंभ.

**जाफराबाद -प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या ''नमो तेलबिया योजनेंतर्गत'' ऑनलाईन नोंदणी केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्याचा शुभारंभ जाफराबाद येथील श्री बालाजी कृषी सेवा केंद्रात उत्साहात पार पडला. आमदार संतोष दानवे यांच्या पाठपुराव्यातून हा उपक्रम राबविण्यात आला. भाजपा तालुका अध्यक्ष नाना भागिले व महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन पाटील, उपसभापती साहेबराव लोखंडे, नगरसेवक सुरेश दिवटे, बेलोरा येथील सरपंच राजेश म्हस्के, माहोरा येथील सरपंच गजानन लहाने, अंबादास जाधव, कृषी विभागाचे सहायक कृषी अधिकारी नखोत, मंडळ कृषी अधिकारी शेळके तसेच बालाजी कृषी सेवा केंद्राचे संचालक अमोल पडघन यांच्यासह कर्मचारी वर्ग, शेतकरी उपस्थित होते.

---

# जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) तर्फे जालना येथे मोफत वेब डिझाईन प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी), आयोजित व जिल्हा उद्योग केंद्र, जालना पुरस्कृत सर्वसाधारण प्रवर्गातील युवक-युवतींकरिता सन २०२६-२७ अंतर्गत मोफत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन जालना येथे करण्यात आले आहे. लाभार्थींनी उद्योग व्यवसाय क्षेत्राकडे वळून स्वतः चा स्वंयरोजगार निर्माण करावा हा कार्यक्रम आयोजनाचा मुख्य उद्देश असल्याने वेब डिझायनिंग प्रशिक्षण कार्यक्रमावर- १ महिना कालावधीच्या या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये करिअर वेब टेक्नोलॉजी, वेब डिझायनर व वेब डेव्हल्प, मार्क लँग्वेज, मार्क अप, बेसिक स्ट्रक्चर, वेब साईड तयार करणे, इत्यादीचे प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर प्रशिक्षण दिले जाणार आहे.

तसेच उद्योजकता विकास प्रशिक्षण, या मध्ये उद्योजकिय गुण संपदा, उद्योजकीय व्यक्तीमत्व विकासासाठी सिध्दी प्रेरणा प्रशिक्षण, बाजारपेठ, पाहणीतंत्र व तंत्र विपणन व्यवस्थापन, प्रकल्प अहवाल, कर्ज योजना व कर्ज प्रकरणे व्यवस्थापन व विक्री कौशल्य लघु उद्योग विषयक कायदे, शासकीय धोरणे, अकाउंटस, लघु उद्योजकाचे व्यवस्थापन, बँकेचे व्यवहार इत्यादीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. सदरील कार्यक्रम हा संपुर्णतः मोफत असुन यासाठी लाभार्थी किमान ७ वी पास, वयोमर्यादा १८ ते ४५वर्ष पात्रता धारक इच्छुक लाभार्थीना प्रवेश व अधिक माहितीसाठी सुरेखा मोरे मो. ९६९९३३४६४८ कार्यक्रम आयोजक यांच्याशी किंवा प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, विनोद तुपे जालना द्वारा-मराठा पार्क बिल्डिंग, विशाल कॉर्नर, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) चौफुली, जालना. फोन.नं.०२४८२-२२०५९२ येथे दि.११ जुन, २०२६ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन महाव्यवस्थापक, जिऊके, जालना योगेश सारणीकर, व विभागीय अधिकारी सुदाम थोटे, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

---

# खरीप हंगाम २०२५ पीकस्पर्धेचे जिल्हास्तरीय निकाल जाहीर

## आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव; एकूण १ लाख ३ हजार रुपयांची बक्षिसे

**जालना - प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२५ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पीकस्पर्धेचे जिल्हास्तरीय निकाल जाहीर करण्यात आले आहेत. यासंदर्भात जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व मका या पिकांच्या उत्पादकतेची आकडेवारी तपासून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. पीकस्पर्धेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांनी अवलंबिलेल्या आधुनिक शेती पद्धती, सुधारित तंत्रज्ञान आणि उत्पादनवाढीसाठी केलेल्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे हा आहे. तसेच विजेत्या शेतकऱ्यांनी वापरलेल्या पीक व्यवस्थापन पद्धती, उत्पादन खर्च नियंत्रण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याबाबतची माहिती इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून कृषी क्षेत्रात उत्पादनक्षमतेत वाढ घडवून आणण्यावर भर देण्यात येत आहे. यावेळी संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय विजेते शेतकरी वगळून उर्वरित पात्र स्पर्धकांमधून तालुकास्तरीय विजेत्यांची निवड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पीकनिहाय जिल्हास्तरीय विजेते

सोयाबीन पीक

सोयाबीन गटात जालना तालुक्यातील दरेगाव येथील श्रीमती रूख्मिणी नवनाथ गोडसे यांनी हेक्टरी ४०.०५ क्विंटल उत्पादन घेऊन प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. बदनापूर तालुक्यातील बाजार वाहेगाव येथील बळीराम रामनाथ काळे यांनी ४० क्विंटल उत्पादनासह द्वितीय क्रमांक मिळवून ७ हजार रुपये, तर जालना तालुक्यातील वंजार उमरद येथील विशाल रामकिसन जायभाय यांनी ३७.३७ क्विंटल उत्पादनासह तृतीय क्रमांक मिळवून ५ हजार रुपयांचे बक्षीस मिळविले.

तूर पीक तूर पिकात बदनापूर तालुक्यातील बाजार वाहेगाव येथील बळीराम रामनाथ काळे यांनी हेक्टरी ३० क्विंटल उत्पादन घेत प्रथम क्रमांक मिळविला असून त्यांना १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

मूग पीक मंठा तालुक्यातील उमरखेडा येथील गोपाल किसनराव जाधव यांनी हेक्टरी १०.२५ क्विंटल उत्पादनासह प्रथम क्रमांक मिळवून १० हजार रुपयांचे बक्षीस पटकावले. उडीद पीक उडीद पिकामध्ये मंठा तालुक्यातील तळणी येथील अरुण अपाराव सरकटे यांनी २२.५० क्विंटल उत्पादनासह प्रथम क्रमांक मिळविला असुन, त्यांना १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. केहाळ वडगाव येथील मधुकर पांडुरंग राठोड यांनी २१.९० क्विंटल उत्पादनासह द्वितीय क्रमांक त्यांना ७ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे, तर तळणी येथील सौ. मनिषा डिगांबर सरकटे यांनी २० क्विंटल उत्पादनासह तृतीय क्रमांक मिळविला असुन त्यांना ५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

भुईमूग पीक जाफ्राबाद तालुक्यातील डोणगाव येथील कौसाबाई दादाराव अंभोरे यांनी हेक्टरी २६.३२ क्विंटल उत्पादन घेऊन प्रथम क्रमांक पटकावला असुन त्यांना १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. टेंभुर्णी येथील रवि साहेबराव खरात यांनी २०.४७ क्विंटल उत्पादनासह द्वितीय क्रमांक मिळविला असुन त्यांना ७ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

---

# राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीसाठी मंत्री प्रकाश आबिटकर यांची नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

**मुंबई -प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (एनएचएम) केंद्रीय अतिरिक्त सचिव व व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक (भाप्रसे.) यांची कर्तव्य भवनमध्ये भेट घेतली. २०२६-२७ च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत (पीआयपी) निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी ही बैठक महत्त्वाची ठरली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी बालकांची वयोमर्यादा दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास या बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली. या महत्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील अधिकाधिक मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. आरोग्य सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आशा स्वयंसेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या दैनंदिन कामकाजातील विविध ऑनलाइन नोंदी, अहवाल सादरीकरण व आरोग्यविषयक माहितीचे डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी आशा स्वयंसेविकांना मोबाईल फोन उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आशा स्वयंसेविकांचे प्रोत्साहनपर मानधन वेळेत वितरित करण्यासाठीही केंद्र शासनाकडून निधी वेळेवर मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जननी सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन कार्यक्रम, क्षयरोग निर्मूलनासाठी निक्षय योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण वेळेत मिळण्यासाठी आवश्यक निधी त्वरित उपलब्ध करून देण्याची; तसेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या नावीन्यपूर्ण आरोग्यविषयक प्रस्तावांना मंजूरी देण्याची मागणी करण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यासाठी अनुदान वेळेवर उपलब्ध करून देणे, तसेच पायाभूत सुविधा कक्ष अंतर्गत प्रलंबित देयके तातडीने मंजूर करण्याबाबत यावेळी आग्रह धरण्यात आला.

या बैठकीत महाराष्ट्रातील निदान सेवा अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर विचारविनिमय झाला . तसेच पीएम एभीम अंतर्गत क्रिटिकल केअर व एकात्मिक सार्वजनिक प्रयोगशाळा साठीचा प्रस्ताव सादर करणेबाबत चर्चा झाली.

'महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून लोकाभिमुख योजना राबवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामध्ये समन्वय वाढवण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी केंद्र शासन सकारात्मक असून, आवश्यक ते सहकार्य मिळेल असा विश्वास आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला. बैठकीस राष्ट्रीय आरोग्य अभियान; तसेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

---

# स्वाधार योजनेच्या लाभासाठी प्रथम वसतिगृह प्रवेश अर्ज आवश्यक

**जालना - प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. चालू २०२६-२७ शैक्षणिक वर्षापासून स्वाधार योजनेचा लाभ मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम ://.. या संकेतस्थळावर शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

गुणवत्तेनुसार अथवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, अशा विद्यार्थ्यांनाच स्वाधार योजनेसाठी पात्र मानण्यात येणार आहे. मात्र, ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्जच केलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळणार नाही.

त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी प्रथम वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहाची सुविधा उपलब्ध नाही, तेथे या नियमामध्ये काही प्रमाणात शिथिलता असली तरी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थी स्वाधार योजनेसाठी पात्र आहेत.

अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत :शालेय अभ्यासक्रमासाठी ३० जून २०२६ पर्यंत इयत्ता ११ वी, १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १५ जुलै २०२६ पर्यंत निर्धारित मुदतीमध्ये संबंधित विद्यार्थ्यांचे प्रस्ताव https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर होणे आवश्यक आहे. असे आवाहन श्रीमती डॉ. अनिता राठोड, सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना यांनी केले आहे.

---

# महाराष्ट्र गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा १४ जून रोजी; जालन्यातील १७ परीक्षा

## केंद्रांच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत () आयोजित करण्यात येणारी महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत जालना शहरातील विविध परीक्षा केंद्रांवर होणार आहे. परीक्षेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जालना शहरातील १७ उपकेंद्रांवर ही परीक्षा पार पडणार आहे. यामध्ये मत्सोदरी शिक्षण संस्था कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज, बद्रीनारायण बारवाले कॉलेज, अंकुशराव टोपे महाविद्यालय, राष्ट्रमाता इंदिरा गांधी आर्टस् अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, नूतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, श्री एम. एस. जैन इंग्लिश स्कूल, राष्ट्रीय हिंदी विद्यालय, सेंट मेरी हायस्कूल (पार्ट ए व पार्ट बी), श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल, आर. जी. बगडिया आर्टस, एस. बी. लखोटिया कॉमर्स अँड आर. बेन्झॉजी सायन्स कॉलेज, रेयान इंटरनॅशनल स्कूल तसेच श्री एम. एस. जैन विद्यालय (मराठी माध्यम) आदी केंद्रांचा समावेश आहे.

परीक्षेच्या कालावधीत परीक्षा केंद्रांच्या परिसरात गर्दी, गोंधळ अथवा अशांतता निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन संबंधित केंद्रांच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

हे आदेश दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत प्रभावी राहणार आहेत. या कालावधीत परीक्षा केंद्रांच्या परिसरात अनावश्यक गर्दी करणे, ध्वनिक्षेपकांचा वापर, मोर्चे, सभा किंवा कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या हालचालींवर निर्बंध राहतील. परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी प्रशासन, पोलीस विभाग आणि संबंधित यंत्रणांनी आवश्यक तयारी पूर्ण केली आहे.

जिल्हा प्रशासनाने उमेदवार, पालक आणि नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले असून परीक्षा केंद्रांच्या परिसरात नियमांचे पालन करून शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# परतूर येथे सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा शेतकरी व नागरिकांशी जाहीर संवाद संपन्न

## भ्रष्टाचार विरोधात तक्रारी करण्याचे आवाहन




**परतूर - प्रतिनिधी**

स्थानिक मराठा क्रांती भवन येथे केंद्रीय अन्वेषण ब्यूरो () च्या लाचलुचपत प्रतिबंधक (अँटी करप्शन) विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी आणि नागरिकांसाठी विशेष संवाद कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. जय जवान, जय किसान या घोषणेचा जयघोष करत, ग्रामीण भागातील नागरिकांचे हक्क आणि त्यांच्या न्यायासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या जनसंवाद कार्यक्रमात बँक कर्ज, केंद्रस्तरीय शासकीय योजना आणि विविध केंद्रीय कार्यालयांमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराविरुद्ध नागरिकांनी कशा प्रकारे तक्रारी करून आवाज उठवला पाहिजे, याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.

''लाचखोरीला आणि भ्रष्टाचाराला अजिबात वाव नाही'' सीबीआय अधिकारी कार्यक्रमादरम्यान उपस्थित पोलिस निरीक्षक उपेंद्र कुमार व पोलिस हेडकॉन्स्टेबल हरिभाऊ लोहकरे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधताना अत्यंत महत्त्वाचे मुद्दे आणि दिशादर्शन मांडले:

भ्रष्टाचाराला थारा नाही - लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये आता कोणत्याही चुकीला माफी मिळणार नाही तसेच आमच्याकडे तक्रार केल्यानंतर १००% कारवाई होणारच असा स्पष्ट इशारा चे पोलिस निरीक्षक उपेंद्र कुमार यांनी दिला.

थेट तक्रार करण्याचे आवाहन -कोणत्याही कामासाठी पैशांची मागणी झाल्यास किंवा छळवणूक झाल्यास दिलेल्या संपर्क क्रमांकावर तात्काळ तक्रार नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले. सर्व केंद्रीय कार्यालये कक्षेत - ग्रामपंचायतींपासून ते केंद्र सरकारच्या सर्व योजनांपर्यंत, कुठेही लाच मागितली गेल्यास त्याविरुद्ध कडक पावले उचलली जातील.

६ तासांत कारवाई - कोणत्याही गैरव्यवहाराची किंवा लाचखोरीची खात्रीशीर तक्रार प्राप्त झाल्यास, अवघ्या ६ तासांच्या आत पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही विभागाकडून देण्यात आली.

या क्षेत्रांवर राहणार विशेष लक्ष - बँका, को-ऑपरेटिव्ह संस्था, नवोदय विद्यालये, एलआयसी (), रेल्वे आणि केंद्रास्तरील सर्व शासकीय कार्यालये यांसारख्या विभागांमधील पारदर्शकतेवर विशेष भर दिला जाईल.

उत्पन्नापेक्षा जास्त संपत्तीवर नजर - जर एखादा केंद्रीय शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी त्याच्या कायदेशीर उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती गोळा करत असल्याचे आढळल्यास, नागरिकांनी त्याबाबत बिनदिक्कतपणे तक्रार करावी.

आपल्या हक्कासाठी नागरिकांची मोठी उपस्थिती -

बँकांकडून कर्ज घेताना शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, एजंटांची कमिशनखोरी आणि पैसे घेतल्याशिवाय काम न करण्याची प्रवृत्ती यांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

आपल्या हक्कासाठी आणि न्यायासाठी जागरूक राहण्याची शपथ घेत, परतूर शहर व परिसरातील ग्रामीण भागातील शेतकरी आणि सुजाण नागरिक व पत्रकार यांनी या चर्चासत्रात मोठ्या संख्येने उपस्थिती लावून हा कार्यक्रम यशस्वी केला.

# नगरसेवक अमोल ठाकूर यांच्याकडून राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांचा सत्कार

**जालना - प्रतिनिधी**

राज्याचे राज्यमंत्री तथा शिवसेनेचे संपर्कप्रमुख आशिष जैस्वाल हे आज जालना शहर दौऱ्यावर आले असता मंठा चौफुली परिसरातील कलशा सिड्स कंपनीच्या सभागृहात शिवसैनिकांशी संवाद साधण्यात आला.

या संवाद कार्यक्रमात शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. यावेळी अर्जुनराव खोतकर, संपर्कप्रमुख भास्कररावजी आंबेकर जिल्हाप्रमुख ए जे बोराडे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडित भुतेकर शिवसेना शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले नगरसेवक अमोल ठाकूर तसेच गणेश मोहिते यांनी राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



कार्यक्रमादरम्यान आशिष जैस्वाल यांनी शिवसेना संघटन बळकटीकरण, पक्षाच्या आगामी कार्यक्रमांची रूपरेषा तसेच जनतेच्या प्रश्नांबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी विविध स्थानिक प्रश्न मांडले असून त्यावर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

या कार्यक्रमाला शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

# वरुडी येथे वादळाचा तडाखा; दोन शेतकऱ्यांच्या सोलर पॅनलचे मोठे नुकसान

## ऐन हंगामात सिंचन व्यवस्था विस्कळीत; तातडीने दुरुस्ती व मदतीची मागणी

**बदनापूर - प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील वरुडी परिसरात बुधवारी (दि. १० जून २०२६) झालेल्या तीव्र वादळ-वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीचा फटका वरुडी येथील दोन शेतकऱ्यांच्या सौरऊर्जा प्रकल्पांना बसला असून, सोलर पॅनल खराब झाल्याने त्यांच्यासमोर गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. ऐन पिकांच्या हंगामात सिंचन व्यवस्थेवर परिणाम झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत.



वरुडी येथील शेतकरी जावेदखान पठाण यांच्या शेतात 'शक्ती' कंपनीचे सोलर पॅनल बसविण्यात आले आहे. बुधवारी अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे त्यांच्या सोलर प्रकल्पातील एक महत्त्वाचे पॅनल फुटून निकामी झाले. त्यामुळे संपूर्ण सोलर यंत्रणेची कार्यक्षमता कमी झाली असून, सोलर पंपातून अत्यल्प प्रमाणात पाणी उपसा होत आहे. याशिवाय सोलर यंत्रणा नियंत्रित करणारे मोबाईल ॲप्लिकेशन आणि ऑपरेटिंग सिस्टीमदेखील पूर्णपणे बंद पडली आहे. परिणामी, सोलर यंत्रणेचे नियंत्रण करणे कठीण झाले असून शेतीच्या कामांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. उभ्या पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने मोठ्या नुकसानीची भीती व्यक्त केली जात आहे. याच वादळाचा फटका महिला शेतकरी ताहेराबी यांनाही बसला आहे. त्यांच्या शेतात बसविण्यात आलेल्या 'जीके' () कंपनीच्या सोलर पॅनलची एक पाटी वादळी वाऱ्यामुळे खराब झाली आहे. पॅनल निकामी झाल्याने सोलर पंपाचा पाणी उपसा मोठ्या प्रमाणात घटला असून, पाणी उपलब्ध असतानाही पिकांना आवश्यक तेवढे पाणी देता येत नाही. त्यामुळे त्यांच्या शेतातील पिके धोक्यात आली असून, त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

दरम्यान, ऐन हंगामाच्या तोंडावर सोलर पॅनलचे नुकसान झाल्याने दोन्ही शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे 'शक्ती' आणि 'जीके' () कंपनीच्या अधिकृत तंत्रज्ञांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन खराब झालेली पॅनल बदलून द्यावीत, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच जावेदखान पठाण यांच्या सोलर यंत्रणेतील बंद पडलेली मोबाईल ऑपरेटिंग सिस्टीम त्वरित सुरू करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

संबंधित महसूल, कृषी व ऊर्जा विभागाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा करावा आणि त्यांना आवश्यक ती मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी जावेदखान पठाण, ताहेराबी तसेच वरुडी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या या नुकसानीची तातडीने भरपाई करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# हातडीत मान-पानाचे राजकारण रंगात; जिल्हा परिषदेच्या शाळेचे बांधकाम मात्र रेंगाळले!

## गोरगरिबांच्या मुलांच्या भवितव्याशी खेळ

**परतूर - प्रतिनिधी**

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे, नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. मात्र, हातडी गावातील दुर्दैवी चित्र काही बदलताना दिसत नाही. गावातील अंतर्गत गटबाजी, मानापमानाचे राजकारण आणि पुढाऱ्यांच्या इर्षेपोटी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे हक्काचे बांधकाम रखडले आहे. ''गावचा विकास की स्वतःचा अहंकार?'' अशा चक्रव्यूहात शाळा अडकल्याने अखेर सामान्य जनतेतून आता तीव्र संताप व्यक्त होत आहे. शेजारची सात गावे पुढे, हातडी मात्र मागेच! विशेष म्हणजे, हातडीसोबतच मंजुरी मिळालेल्या परिसरातील तब्बल सात गावांमधील शाळांची बांधकामे पूर्ण होऊन तेथील वर्गखोल्या चकाचक झाल्या आहेत. मात्र, हातडीत अद्याप विटांवर विटा



रचल्या गेलेल्या नाहीत. गावात जिल्हा परिषदेचे शिक्षक उत्तम दर्जाचे आणि ज्ञानदानासाठी तत्पर आहेत, पण त्यांना आणि विद्यार्थ्यांना बसायला हक्काची छतं नाही, ही शोकांतिका आहे.

पुढाऱ्यांची मुलं इंग्लिश स्कूलमध्ये; गरिबांच्या मुलांचं काय?

गावातील श्रीमंत, पांढरपेशा वर्ग आणि राजकारण्यांची मुले बाहेर तालुक्याला किंवा परतूरच्या मोठ्या इंग्लिश स्कूलमध्ये वातानुकूलित गाड्यांमधून शिक्षणासाठी जातात. मात्र, ज्या गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या जीवावर हे राजकारण चालते, त्यांच्या मुलांनी नेमके कुठे बसायचे? पावसाळ्यात छतातून गळणाऱ्या पाण्याचा सामना करत या मुलांनी जगायचे कसे, हा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

''निवडणुकीत गुडघ्याला बाशिंग बांधणारे आता कुठे गेले?''

ग्रामपंचायतीच्या निवडणुका आल्या की सरपंचापदाचे डोहाळे लागणारे आणि सदस्यत्वासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून फिरणारे गल्लीबोळातील पुढारी आता मूग गिळून गप्प आहेत. मतांचे राजकारण करण्यासाठी अहोरात्र धावणाऱ्या आजी, माजी आणि भावी नेत्यांना या पडक्या शाळेची दुरावस्था का दिसत नाही?

कर्तव्यदक्ष अधिकारी रवि कवडे यांच्याकडून न्यायाची अपेक्षा

गावातील राजकारणी सुस्त असले तरी प्रशासनाकडून ग्रामस्थांना मोठ्या अपेक्ष आहेत. परतूरचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी () श्री. रवि कवडे यांनी या प्रकरणात विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी आता ग्रामस्थांनी लावून धरली आहे. स्थानिक पातळीवरील खोडा घालणाऱ्या प्रवृत्तींना बाजूला सारून कवडे साहेबांनी आपल्या अधिकारात हे बांधकाम तातडीने मार्गी लावावे, अशी विनंती गावकरी करत आहेत.

काही जण या परिस्थितीवर बोलणाऱ्यांना हा कोणाच्या तरी ओंजळीने पाणी पितोय असा शिक्का मारण्याचा प्रयत्न करतील. परंतु, हा आवाज कोणत्याही राजकीय फायद्यासाठी नाही, तर गावातील निष्पाप मुलांच्या भविष्यासाठी आणि हक्कासाठी आहे.

आता तरी गावातील सर्वपक्षीय आजी-माजी लोकप्रतिनिधी, भावी उमेदवार आणि शिक्षण विभागाने गांभीर्याने लक्ष

# १५ मे रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना- प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यासाठी दि. १५ जून, २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करण्याचे आवाहन केले आहे. अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे,

तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही. महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील.

तालुकास्तरावरील लोकशाही दिनात अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# संत रोहिदास महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**मुंबई - प्रतिनिधी**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी २०२६-२०२७ या वर्षात ५० टक्के अनुदान योजना' (९ लाभार्थी) आणि 'बीज भांडवल योजना' (११ लाभार्थी) राबविण्यात येत आहे. कर्ज या योजनेच्या लाभासाठी इच्छुक लाभार्थींनी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी सपर्क साधवा, असे आवाहन करण्यात येत आहे.

**कर्ज प्रस्तावासोबत अर्जदाराने जोडावयाची कागदपत्रे :-**

जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड.

शैक्षणिक दाखला, तीन फोटो कॉपीज, पॅन कार्ड, लाभार्थाचा उद्योग आधार प्रमाणपत्र, ज्या ठिकाणी व्यावसाय करावयाचा असेल त्या जागेचा पुरावा (जागेचे लाईटबील, टॅक्स/भाडे पावती/भाडे करारनामा/जागा वापर संमती पत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा इ.) कागदपत्र खरी असल्याबाबत लाभार्थ्यांचा विनंती अर्ज व ज्या जागी व्यावसाय चालू आहे त्याच जागेचे प्रमाणित केलेले छायाचित्र. ग्रामपंचायत, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र व्यावसायासबंधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला

आवश्यकतेनुसार प्रकल्प अहवाल, सनदी लेखापालच्या सही व शिक्यासह

खरेदी करावयाच्या मालमत्तेच्या साहित्याचे जी.एस.टी. क्रमांक असलेले दरपत्रक (कोटेशन).

अर्जदाराचे वारसदाराच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र (रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर) अर्जदाराचे तसेच जामिनदारांचे विहीत नमुन्यातील शपथपत्र (रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर) लाभार्थाचा आधारकार्ड क्रमांक तसेच आधार संलग्न बैंक खाते क्रंमाक

दोन सक्षम जामिनदार (नोकरदार किंवा मालमत्ताधारक/शेतकरी) सक्षम दोन जामिनदार अ २ शासकीय जामिनदारांच्या कार्यालयाचे हमीपत्र अथवा ब २ शेतकरी /मालमत्ताधारक यांचे सात बारा/नमुना क्र. आठच्या उता-यावर सक्षम अधिका-याची सही व शिक्यानुसारची उतारे सोबत सह. दुय्यम निबंधक अथवा गर्व्हमेंट व्हल्युवर यांचे सबंधित मालमत्तेचे मुल्यांकन पत्र अथवा प्रमाणपत्र आवश्यक.

अर्जदार हा चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, होलार आदी) असावा. यापूर्वी त्याने महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. इच्छुक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाच्या तीन प्रती कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई शहर, गव्हर्नमेंट लेदर वर्किंग स्कूल कंपाऊंड, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे स्वतः उपस्थित राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसह कर्ज प्रस्ताव दाखल करावेत. या योजनांचा लाभ घेऊन समाजबांधवांनी आपली सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.